माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ३९/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. प्रशांत हरिओम अरोरा,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
ग्राम पंचायत, कवठा ता. कामठी जि. नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक,**
पंचायत समिती कामठी, ता. कामठी जि. नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १९.०७.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| **द्वितीय अपील आदेशाचा दिनांक** | **आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक** | **मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** |
|---|---|---|
| १३.०२.२०२० | --- | १६.०२.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. १३५७/२०१९, १३५८/२०१९ मध्ये दिनांक १३.०२.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १९.०७.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, कवठा, ता. कामठी , जि. नागपूर श्री. एन. एस. देवगडे, उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती कामठी, जि. नागपूर, श्री. मनिष पं. दिघाडे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. १३५७/२०१९,१३५८/२०१९ मध्ये दिनांक १३.०२.२०२० रोजी सुनावणी घेवून " १. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत कवठा, ता. कामठी जि. नागपूर यांनी अपिलार्थी यांच्या दि. ०२.१२.२०१५ च्या तक्रारी निकाली काढल्या नाहीत. तसेच दाखल केलेल्या माहिती अर्जावर ३० दिवसाच्या विहीत मुदतीत उपलब्ध व देय ठरत असलेल्या माहितीचे अपीलार्थीस प्रदान केलेले नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.डी. खडसे यांना कलम २०(१) नुसार रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येत आहे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक यांनी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातुन शास्तीची रक्कम सोयीनुसर हप्ते पाडून ००७० इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा,८००-इतर जमा रक्कम, १८-माहितीचा अधिकार ००७०-०१६१ या लेखाशिर्षाखाली जमा करावी व वसुल केलेल्या रकमेच्या चालानाच्या प्रती आयोगास सादर करावा, असे आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती कामठी ता. कामठी जि. नागपूर यांना आदेशित करण्यात येते.

३. अपीलार्थी यांच्या दि. ०२.१२.२०१५ रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती कामठी, जि. नागपूर यांनी तात्काळ निपटारा करावा व अपिलार्थी यांनी मागणी केलेल्य माहितीचे प्रदान करावे व तसा अनुपालन अहवाल सदर आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

४. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्येक आदेश कलम १९(७) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारीत वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करुन अवमान केल्यस प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द भारतीय दंड संहिता, १९०८ चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. " असे आदेशित करून प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक १६.०२.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. १३५७/२०१९, १३५८/२०१९ मध्ये दिनांक १३.०२.२०२० रोजी पारित आदेशानुषंगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.डी. खडसे यांना कलम २०(१) नुसार रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात आली आहे. अपीलार्थी यांच्या दि. ०२.१२.२०१५ रोजी दाखल केलेल्या

तक्रारीच्या अनुषंगाने विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती कामठी, जि. नागपूर यांनी तात्काळ निपटारा करावा व अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे प्रदान करावे. त्यानुषंगाने ग्रामपंचायत यांनी या प्रकरणी जी कार्यवाही केली त्यांची छायांकित प्रत प्रदान करण्याबाबत आदेशित केले. आयोगाच्या आदेशानुसार तत्कालिन जनमाहिती अधिकारी सचिव, ग्राम पंचायत कवठा, ता. कामठी जि. नागपूर यांच्याकडून रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) एवढी शास्ती दि. ३१.०८.२०२१ रोजी कोषागारात सादर करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात अपिलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जानुषंगाने व वारसा हक्कासंबधी व ग्रामपंचायत कवठा येथे केलेल्या तक्रारी अर्जावर बेकायदेशीर बांधकाम करण्यावर कारवाई करावी. याबाबत तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मौखिक प्रतिसाद दिला असून अपिलार्थी यांनी दि. ०२.१२.२०१५ रोजी वारसा हक्का संबधीत केलेल्या तक्रार अर्जावर सदर आदेश प्राप्त होताच पुढील ४ आठवड्याच्या आत प्रचलित नियम व कायद्यानुसार प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा, या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★ नागपूर ★

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १९.०७.२०२३

जा.क्र. E422 दि. 30 NOV 2023